# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 18/10/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

प्रत - प्रमुख लिपीक- पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वाचक शाखा (पोअ यवतमाळ.)

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

## निरंक

# भाग २ - रजा

क्रमांक :- पोअय/सआली-4/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/ 11855 /2019 यवतमाळ, दिनांक :- 18 OCT 2019

विषय :- कर्तव्यावर हजर करुन घेणे बाबत. ..

--- 000 ---

पोहवा/1744 सोमेश्वर कोल्हे नेमणुक, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे दि. 09.10.2018 ते 25/09/2019 (352 दिवस) सिक रजेवर होते. तरी सदर कर्मचारी यांना दिनांक 25.09.2019 रोजी कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांचा दिनांक 09.10.2018 ते 25/09/2019 (352 दिवस) पर्यतचा सिक कालावधी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कालावधी | एकुण दिवस | रजा |
|---|---|---|---|
| 1. | 09.10.2018 ते 17.06.2019 | 252 दिवस | अर्जित रजा |
| 2. | 18.06.2019 ते 25.09.2019 | 100 दिवस | परावर्तीत रजा |

**मा. पो. अ. यांचे मान्यतेने**

( पि.के. गिरोलीकर )
(प्र.) कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे करीता

प्रति,

राखिव पोलीस निरीक्षक,
पोलीस मुख्यालय यवतमाळ

## भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

निरंक

## भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र.:डीपी/३१-बी-२/२०३ गुप्ता/अंआ/ 11843 /२०१९ यवतमाळ दि. 18 OCT 2019.

## अंतिम आदेश

कसुरी -

आपण २०१७ पासुन पो.स्टे.मारेगाव येथे हेडमोहरर म्हणुन काम पाहत आहात.प्रभारी अधिकारी पो.स्टे.मारेगाव यांनी आपणास पो.स्टे.ला बेवारस असलेले वाहन रु.१०००/- आतील दारुचा मुद्देमाल तसेच प्रलंबित सी.ए.अहवाल यांची यादी सादर करणे वारंवार तोंडी तसेच लेखी आदेशित केले असतांना सुध्दा आपण त्याबाबतची माहीती सादर केली नाही.तसेच याबाबत विचारणा केली असता आपण अतिशय उध्दट भाषेत प्रभारी अधिकारी यांना पो.स्टे.चे इतर कर्मचा-याचे समक्ष उत्तर देता.तसेच "तेच काम नाही मला घरचा प्रोब्लेम आहे मी एकटा काय काय करु " असे उध्दटपण् बोलतात.

प्रकरणी कर्तव्यात केलेला कसुरीबाबत आपणांस आपणांस क्र.डीपी/३१-बी/२/ पोहवा २०३ गुप्ता/कसुरी/१०२८९/२०१९ यवतमाळ दि.२९/८/२०१९ नुसार **"एक महीन्याचे मुळ वेतनाइतका " आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले.सादर केलेल्या स्पष्टिकरणाचे अवलोकन करुन व सहानभुतीपुर्वक विचार करुन प्रस्तावित शिक्षा माफ करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारची पुनरावृती पुन्हा होणार नाही.याची दक्षता घ्यावी. करीता आपणास **सक्त ताकीद** देण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**पोहवा/२०३ रविंद्र गुप्ता मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.मारेगाव**

२/- उपरोक्त नोटीसची मूळ प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**प्रत-** डीपीजी लिपीक /आस्थापना लिपीक/सआली - २ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्र.:डीपी/३१-बी -२ /पोशि २४८९ धनंजय/अंआ/ 11842 /२०१९ यवतमाळ दिनांक 18 OCT 2019

## अंतीम आदेश

**कसूरदार :- पोशि/२४८९ धनंजय पोटपल्लीवार पो.स्टे.लाडखेड**

**कसूरी :-**

आपणास दि.१२/४/२०१९ रोजी लोकसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने यवतमाळ येथे मतपेटी सुरक्षा डयुटी करीता पाठविण्यात आले होते.त्यानंतर दि.२४/५/२०१९ रोजी बंदोबस्त संपल्याने आपणास पो.स्टे.ला परत करण्यात आले होते. आपण दि.२५/५/२०१९ रोजी पो.स्टे.ला हजर होणे अपेक्षित असतांना आपण दि.४/६/२०१९ पावेतो परस्पर गैरहजर राहीले. याची नोंद स्टेशन डायरी ला घेण्यात आली.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यातील गैरहजेरी कसुरीबाबत आपणांस क्र.डीपी/३१-बी-२/पोशि २४८९ धनंजय/गैरहजर/७८३६/२०१८ यवतमाळ दि.४/७/२०१९ नुसार ' रु.५०००/-' आर्थिक दंड या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पर्ष्टीकरण सादर केले नाही. तरी प्रस्तावित का.दा.नो. मधील शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोशि/२४८९ धनंजय पोटपल्लीवार** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु.५०००/-' आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अर्पीत अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**पोशि/२४८९ धनंजय पोटपल्लीवार पो.स्टे.लाडखेड**

**मार्फत - ठाणेदार, पो.स्टे.लाडखेड**

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**प्रत :-** वेतन लिपीक -१/ कर्म.आस्थापना लिपीक / सआली ५/डीईजी लिपीक/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्र.:डीपी/31-बी -2 /1871 संदिप/अंआ/ 11841 /2019 यवतमाळ दिनांक 18 OCT 2019

## अंतीम आदेश

**कसूरदार :-** **पोना/1871 संदिप टेकाम** पो.स्टे.अवधुतवाडी

**कसूरी :-**

आपल्याकडील तपासावर असलेल्या गुन्हयांचा आढावा घेण्यात आला असता एक वर्षावरील भाग 5 चे 05 गुन्हे व भाग 06 चे 02 गुन्हे ते मर्ग 02 प्रकरणे तपासावर प्रलंबित असल्याचे दिसुन आले.आपणास वरीष्ठांनी प्रकरणे निकाली काढण्याबाबत सुचना दिली आहे.आपल्याकडे तपासावर एक वर्षावरील प्रकरणापैकी मोटार वाहन कायदा अंतर्गत 4 प्रकरणे मा.न्यायालयात दाखल केले असता प्रकरणाचे दोषारोपपत्र न्यायालयात मुदतबाहय दिवसाने दाखल केल्याने दि.04/12/2017 रोजी खारीज केले आहे.गुन्हे निर्गती बाबतचा हलगर्जीपणा व निष्काळजीपणामुळे गुन्हयातील आरोपीतांना शिक्षा होवु शकली नाही.आपण नेहमी गैरहजर राहण्याचे सवयीचे आहेत.तसेच अनधिकृतपणे व सीक रजेवर जाण्याचे सवयीचे आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यातील गैरहजेरी कसुरीबाबत आपणांस क्र.डीपी/31-बी/पोना 1871 टेकाम/कसुरी/8837/2018 यवतमाळ दि.3/7/2019 नुसार **' एक वर्ष वेतनवाढ स्थगिती ' परीणामकारक** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी ही सुधारण्याची शेवटीची संधी देवुन व शिक्षा कमी करुन प्रस्तावित कादानो मध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोना/1871 संदिप टेकाम** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' एक महीन्याचे मुळ वेतनाइतका ' आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

Aa

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

क्रमांक :- पोअय/सआली-3/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/11860/2019 यवतमाळ, दिनांक :- 18 SEP 2019

विषय :- कर्तव्यावर हजर करुन घेणे बाबत

--- 000 ---

**पोशि/1143 संदिप मुप्पीडवार नेमणुक, पोलीस मुख्यालय यवतमाळ** हे दि 23.08.2019 ते 18/10/2019 (57 दिवस) सिक रजेवर होते. ते दिनांक 18/10/2019 रोजी कर्तव्यावर हजर होणे करीता आले आहे. तरी सदर कर्मचारी यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तेव्हा सदर पोशि/1143 संदिप मुप्पीडवार यांचा सिक अहवाल ठाणेदार व उपविपोअ यांचे मार्फतीने दिलेल्या सुचनेप्रमाणे स्पष्ट अभिप्रायासह त्वरीत सादर करावा.

**(अनिलसिंह गौतम )**
(प्र.) पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे करीता

प्रति,
राखीव पोलीस निरीक्षक,
पोलीस मुख्यालय यवतमाळ

प्रत :- डिपीजी यांना योग्य कार्यवाहिस्तव

# समाप्त